**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः दत्ताराम रामजी वाघमारे

वयः ४२ वर्षे, व्यवसायः पोलीस पाटील,

राहणार – निडी, रोहा, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.२३.१२.२०२३ रोजी मला पोलीस मेंगाळ यांनी शेणवई येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. शेणवई येथे किशोर देशमुख यांच्या घरासमोर आम्ही गेलो. तेथे घटनास्थळ काजल देशमुख हिने दाखवले. तिने इथे गुन्हा घडल्याचे सांगितले. तिथे नळाची टाकी होती. ते घटनास्थळ गावातील लोकवस्तीत होते. पोलीसांनी तेथे पंचनामा केला.

०२. त्यानंतर फिर्यादी काजल व पोलीस आम्हाला घटना घडलेल्या दुस–या ठिकाणी घेवुन गेले. सदर घटनास्थळ अलिबाग–रोहा रस्त्यावर मोरीच्या जवळ होते. तेथे घटना घडली होती. सदर रोड पुर्व–पश्चिम असा आहे. मल दिशा कळत नाही परंतु एका बाजुला पोल्ट्री फार्म व दुस–या बाजुला शेती होती. पोलीसांनी तेथे घटनास्थळाचा नकाशा काढला. आता मला दाखवलेला नकाशा तोच आहे. त्यावर क्र.१ ची सही माझी आहे. त्यानंतर पोलीसांनी तेथे चार–पाच फोटो काढले होते. आता मला दाखवलेले चार फोटो तेच असुन त्यांना एकत्रितपणे **आर्टिकल अ** देण्यात येत आहे. पोलीसांनी तेथे पंचनामा पुर्ण केला व आमच्या सहया घेतल्या. आता मला दाखवलेला पंचनामा तोच असुन त्यावर क्र.१ ची सही माझी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर पंचनामा व नकाशा यांना एकत्रित

**नि.क्र.१७** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. पी. सानप यांच्यामार्फत सुरु.**

०३. पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता फोन करुन बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील म्हणुन काम करत असताना उपविभागीय अधिकारी व पोलीस ठाणे रोहा यांना कायदा व सुव्यवस्थाबाबत इतिवृत्त दयावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या अनुषंगाने दिलेल्या सुचनांचे मला पालन करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावर मी पोलीसांनी सुचविल्यामुळे कर्तव्याचा भाग म्हणुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकुराविषयी मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यात नमुद असलेल्या मोजमापाविषयी मला माहिती नाही. पहिले आम्ही काजलच्या घराजवळ असलेल्या घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी गेलो. तेथे असलेले घर कोणाच्या मालकीचे आहे याबाबतचे कागदपत्र पाहिले नाही. त्या घराजवळ असलेल्या नळाच्या टाकीचे मोजमाप मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे टाकी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्या गावात एसटी स्टँडपासुन जाणा-या मुख्य अंतर्गत रस्त्याला लागुन काजलचे घर आहे. नळापासुन काजलच्या घराच्या हॉलपर्यंतच्या अंतर्गत रचनेविषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या घराला लागुन आजुबाजुला इतर घरे होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे असलेला रस्ता रहदारीचा होता.

०४. माझे शिक्षण इ.१२ वी पर्यंत झाले आहे. पोलीस पाटील होण्यासाठी आम्हाला मुलभुत प्रशिक्षण दिले जाते. मला सामान्य चार दिशांचे ज्ञान आहे. मला घराजवळच्या घटनास्थळाच्या चर्तु:सिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दिशा कळत नसल्याचे मी खोटे सांगत असुन मी घटनास्थळी गेलो नव्हतो. आर्टिकल अ

वरील चार फोटो पोलीस नागावकर यांनी त्यांच्या मोबाईलमधुन काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते फोटो घटनास्थळाच्या पंचनाम्यावेळी काढले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ वरील पहिल्या फोटोत टाकी कोठेही दिसत नाही. दुस–या पंचाचे नाव अशोक जाधव होते. हे म्हणणे खरे नाही की, अशोक जाधव माझ्या गावाजवळचा असल्यामुळे त्याची माझी पुर्वी पासुन ओळख आहे. दोन्ही घटनास्थळापासुन माझे गाव अंदाजे ३ ते ३.५ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला घटनास्थळाविषयी पुर्वीपासुन माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यासोबत असलेला नकाशा कोठे, कधी व कोणी तयार केला याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशात नमुद असलेल्या दिशा पोलीसांनी स्वतःहुन लिहिल्या असुन मला त्या माहित नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा व नकाशावर मी पोलीस ठाण्यात सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन केवळ कर्तव्याचा भाग म्हणुन मी पंचनाम्यावर सहया केल्या व सदर पंचनामा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.02.03 11:00:03 +0530

स्थळ : रोहा.
दि. ०२.०२.२०२६

(एस. व्ही. खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.